# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 24 August 2024

Time: 7.10 to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: २४ ऑगस्ट २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

***ठळक बातम्या***

- **नेपाळमध्ये प्रवासी बस दरीत कोसळून झालेल्या अपघातात जळगावच्या २७ भाविकांचा मृत्यू**
- **मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर बदलापूर प्रकरणी महाविकास आघाडीचा आजचा बंद मागे–संबंधित शाळेचं संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासकाची नेमणूक**
- **अवैध गर्भलिंगनिदान प्रकरणी डॉ.दिलीपसिंग राजपूतला २९ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी**
- **धाराशिव – तुळजापूर रेल्वे मार्गाचं काम येत्या एक सप्टेंबर पासून सुरू होणार**

**आणि**

- **डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६६ वा वर्धापन दिन विविध कार्यक्रमांनी साजरा**

***सविस्तर बातम्या***

नेपाळमध्ये एक प्रवासी बस दरीत कोसळून झालेल्या अपघातात जळगावच्या २७ भाविकांचा मृत्यू झाला, तर १६ भाविक जखमी झाले. ४३ भाविकांसह ही बस पोखराहून काठमांडूला जात असताना मार्सयांगडी नदीत कोसळून हा अपघात झाला. हे सर्व भाविक जळगाव जिल्ह्याच्या भुसावळ तालुक्यातले रहिवासी आहेत. जखमींवर काठमांडू इथल्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत तर अपघातातल्या

मृतांचे पार्थिव देह आज संध्याकाळपर्यंत विशेष विमानाने नाशिक इथं आणण्यात येणार असून त्यानंतर ते मृतांच्या नातेवाईकांकडे सोपवण्यात येणार आहेत. दुर्घटनेचं वृत्त कळताच, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, भुसावळचे आमदार संजय सावकारे काठमांडूकडे रवाना झाले आहेत.

या भीषण दुर्घटनेबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शोक संवदेना व्यक्त केल्या आहेत.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या रविवारी जळगाव इथं येणार आहेत. देशभरातल्या ११ लाख लखपती दिदींना त्यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात येणार आहेत. वर्षाला एक लाख रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न कमावणाऱ्या लखपती दीदींबरोबर ते यावेळी संवाद साधतील. पंतप्रधान यावेळी राज्यातल्या स्वयंसहाय्यता गटांसाठी अडीच हजार कोटी रुपयांचा फिरता निधी, तसंच पाच हजार कोटी रुपयांचं बँक कर्ज जारी करतील.

दरम्यान, उद्या सकाळी ११ वाजता, आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रम मालिकेतून पंतप्रधान देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रम मालिकेच्या तिसऱ्या आवृत्तीचा हा तिसरा भाग असेल.

****

बदलापूर अत्याचार प्रकरणी महाविकास आघाडीचा आजचा नियोजित बंद मागे घेण्यात आला आहे. अशाप्रकारे बंद घोषीत करणं बेकायदेशीर असून, कोणत्याही पक्षाला बंद पुकारण्याचा अधिकार नाही, असा निर्णय काल मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे, या बंद विरोधात विधीज्ञ गुणरत्न सदावर्ते यांनी न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर काल झालेल्या तातडीच्या सुनावणीत न्यायालयाने हा निर्णय दिला, त्यानंतर बंद मागे घेत असल्याचं, महाविकास आघाडीने जाहीर केलं.

न्यायालयाच्या निर्णयाचा आदर ठेवून बंद मागे घेतला, तरी या प्रकरणाच्या विरोधात आज काँग्रेस पक्षातर्फे निषेध करण्यात येणार असल्याचं प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितलं आहे. आज सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत काँग्रेस पक्षाचे सर्व नेते आणि कार्यकर्ते राज्यातल्या सर्व जिल्ह्यात तोंडाला काळ्या पट्ट्या बांधून आणि हातात काळे झेंडे घेऊन महायुती सरकारचा निषेध करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

या प्रकरणी संबंधित शाळेचं संचालक मंडळ राज्य शासनानं बरखास्त केलं आहे. या शाळेवर आता प्रशासकाची नेमणूक करण्यात आली आहे.
या प्रकरणातल्या आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची सरकार मागणी करणार असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. नाशिक इथं काल महिला सक्षक्तीकरण अभियानाअंतर्गत महाशिबीर घेण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. लाडकी बहीण योजनेबरोबरच आता सुरक्षित बहीण योजनाही राबवण्यात येईल, असं सांगताना त्यांनी, बदलापूर प्रकरणावर विरोधक राजकारण करत असल्याच्या आरोपाचा पुनरुच्चार केला. यासंदर्भात न्यायालयाच्या निर्णयाचा आदर राखून कारवाई करण्यात येईल असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.
मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेला मिळत असलेल्या प्रतिसादाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं. ३१ ऑगस्ट नंतरही या योजनेचे अर्ज भरता येतील आणि तीन महिन्यांची एकत्रित रक्कम पात्र महिलांच्या खात्यात जमा होईल, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

****

अवैध गर्भलिंगनिदान प्रकरणात गेल्या दीड महिन्यांपासून फरार असलेला मुख्य सूत्रधार डॉ.दिलीपसिंग राजपूत याला न्यायालयानं २९ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.जालना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानं काल जळगाव जिल्ह्यातल्या पळसखेडा मिराचे इथून त्याला अटक केली. राजपूत याच्या भोकरदन इथल्या अवैध गर्भलिंगनिदान केंद्रावर आरोग्य विभाग आणि पोलीस प्रशासनानं गेल्या महिन्यात संयुक्तरित्या कारवाई करत सोनोग्राफी मशीनसह रोख रक्कम आणि गर्भपातासाठी वापरलेल्या जाणाऱ्या औषधांचा साठा जप्त केला होता. या कारवाईनंतर तो फरार झाला होता.

****

धाराशिव – तुळजापूर रेल्वे मार्गाचं काम येत्या एक सप्टेंबर पासून सुरू होणार आहे. आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी ही माहिती दिली. या रेल्वेमार्गाच्या कामाचा आढावा घेण्यासाठी धाराशिवचे जिल्हाधिकारी सचिन ओंबासे यांच्या उपस्थितीत काल झालेल्या बैठकीत त्यांनी ही माहिती दिली. एकूण ११० किलोमीटर पैकी धाराशिव ते तुळजापूर या ४१ पूर्णांक चार किलोमीटर लांबीच्या रेल्वे मार्गाच्या कामाची ४८७ कोटींची निविदा अंतिम झाली असून, कंत्राटदाराला

नियुक्ती आदेश देऊन एक सप्टेंबर पासून काम करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

****

**या बातम्या आकाशवाणीच्या छत्रपती संभाजीनगर केंद्रावरुन देत आहोत.**

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६६ वा वर्धापन दिन काल साजरा झाला. यानिमित्त आयोजित मुख्य कार्यक्रमात मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर रवींद्र कुलकर्णी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्व विकासासाठी तसंच त्यांच्यातील कला आणि कौशल्य विकसित करण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचं, कुलकर्णी यावेळी म्हणाले. शैक्षणिक क्षेत्रात होणाऱ्या बदलांसाठी शिक्षक, प्राध्यापकांनी सजग राहावं, असंही त्यांनी सांगितलं. या कार्यक्रमात प्रसिद्ध लोककलावंत पांडुरंग घोटकर यांना जीवन साधना पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. तसंच गुणवंत विद्यार्थी, कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

****

धाराशिव इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसरात काल राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीनं "विद्यार्थ्यांचा ग्राम विकासामध्ये सहभाग" या विषयावर सिंधुदुर्ग इथले भागीरथ ग्रामविकास प्रतिष्ठानचे डॉक्टर प्रसाद देवधर यांचं व्याख्यान झालं. बायोगॅस निर्मिती प्रकल्पाची यशोगाथा त्यांनी यावेळी विशद केली.

****

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे यावर्षी जुलै आणि ऑगस्ट महिन्यात घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या पुरवणी परीक्षेचा निकाल काल ऑनलाईन जाहीर झाला. यात दहावीच्या परीक्षेत ३६ पूर्णांक ७८ टक्के, तर बारावीच्या परीक्षेत ३२ पूर्णांक ४६ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे.

****

आकांक्षित जिल्हा कार्यक्रमांतर्गत धाराशिव जिल्ह्याला देशभरातून तिसरा क्रमांक मिळाला आहे. जिल्हा प्रशासनानं केंद्र तसंच राज्य सरकारच्या मदतीने केलेल्या विविध उपाय योजनांमुळे ही कामगिरी करता आल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य शिबिरांचं आयोजन करण्यात आलं आहे. मुख्यमंत्री वयोश्री योजना आणि मुख्यमंत्री तीर्थयात्रा योजना या योजनांचा लाभ सुलभतेने घेता यावा यासाठी जिल्ह्यातल्या सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, उपजिल्हा रुग्णालयं, ग्रामिण रुग्णालयांमध्ये ही शिबीरं होत आहेत.

****

बीड जिल्ह्यात परळी वैजनाथ इथं सुरू असलेल्या राज्यस्तरीय कृषी महोत्सवाला शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. काल दुसऱ्या दिवशी विविध भागातल्या शेतकऱ्यांनी या प्रदर्शनाला भेट देऊन, माहिती जाणून घेतली. कृषी उत्पन्नावर आधारित विविध विषयांवरचे परिसंवाद तसंच चर्चासत्र यावळी घेण्यात आले.

****

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी प्राप्त काही अर्जांमधल्या त्रुटींची पूर्तता करून अर्ज पुन्हा जिल्हास्तरीय समितीकडे पाठवावेत, अशी सूचना लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केली आहे. शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत काल त्या बोलत होत्या. आतापर्यंत अर्ज न केलेल्या पात्र महिलांनी पोर्टलवर अर्ज सादर करण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

****

जालना जिल्ह्यात काल काही भागात हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस झाला. भोकरदन तालुक्यात परवा रात्री झालेल्या जोरदार पावसामुळे पद्मावती धरणाच्या सांडव्यावरून पाणी वाहत आहे. धरण पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे या भागातल्या २५ गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटला आहे.

****

परभणी जिल्ह्यात सध्या सर्वदूर मुसळधार पाऊस पडत आहे. यंदाच्या पावसाळ्यातल्या सर्वात मोठा पाऊस हा होता.

****